Rotary | CREATE LASTING IMPACT | TEAM PHOENIX

83 YEARS OF UNTIRING SERVICE

# ROTARY CLUB OF KOLHAPUR

RI District 3170 | Club No. : 15655 | Charter No. : 5685 | Charter Date. : 01-11-1943

# ROTARY HERALD

WEEKLY BULLETIN 2026-27

DATE : 23 July 2026

## JULY : MATERNAL & CHILD HEALTH MONTH

### मागील मीटिंग चा रिपोर्ट



आपले सभासद व पास्ट प्रेसिडेंट रो. सुभाष कुत्ते हे मागील सभेचे वक्ते होते. त्यांची ओळख रो.जयेश गांधी यांनी करून दिली. बँकिंग क्षेत्रातील तज्ञ मते मांडताना त्यांनी या क्षेत्राचा संपूर्ण इतिहास सर्वांसमोर उभा केला त्यांनी स्वतः सध्याची आरबीएल बँक व पूर्वाश्रमीच्या रत्नाकर बँकेचे चेअरमन एमडी व सीईओ ही सर्व पदे भूषवली होती. त्यामुळे या क्षेत्रातील सविस्तर माहिती त्यांना आहे .

पूर्वी बँका संपूर्णपणे सुरक्षित वातावरणात काम करीत होत्या. ज्यामध्ये व्याजाच्या दरासहित सर्वच गोष्टी बंधनकारक होत्या , त्या काळात हा व्यवसाय नव्हे तर सेवा या स्वरूपात पाहिला जात होता. त्यानंतर पुढील काळात व्याजदर व इतर काही नियम ठरवण्याचे अधिकार बँकांसाठी खुले केले. त्यामुळे स्पर्धा वाढली व शाखा विस्तार, व्यवसाय वाढ ही वेगाने होऊ लागली.

परंतु या कालावधीत काही कारणांमुळे महाराष्ट्रातील सातारा स्थित युनायटेड वेस्टन बँक सांगलीची सांगली बँक, गणेश बँक ऑफ कुरुंदवाड व इतर काही बँका इतर बँकांमध्ये समाविष्ट करणे भाग पडले परंतु अशी वेळ रत्नाकर बँकेवर येऊ न देण्याची योग्य ती काळजी त्यांनी आणि त्या वेळच्या डायरेक्टर बोर्डाने घेतली. व पुढे आरबीएल बँक या नावाने ती वेगाने वाढली. हा बँकिंग व्यवसायाचा इतिहास त्यांनी सर्वांसमोर सविस्तर मांडला. आभार प्रदर्शन करताना रो. संजीव चिपळूणकर यांनी रत्नाकर बँक वाढवण्याचे संपूर्ण श्रेय त्यांनाच जाते असे सांगून आपण स्वतःच रोटरी मध्ये त्यांना आणले व त्याचा आपल्याला अभिमान वाटतो असे नमूद केले व सविस्तर माहिती बद्दल त्यांचे आभार मानले लकी रोटेरियन ठरले रो जयेश गांधी.

******

Driving **Innovation** and **Growth** for **Better Future**

**RTN. DR. LENNY DA COSTA**
DISTRICT GOVERNOR 2026-27

**RTN. OLAYINKA BABALOLA**
R I PRESIDENT 2026-27

**RTN. HARSHAD DHALE**
CLUB SECRETARY 2026-27
rtn.harshad3170@gmail.com

**RTN. PRADEEP PASMAL**
CLUB PRESIDENT 2026-27
rtn.pradeep3170@gmail.com

**RTN. NILESH KUTTE**
JT. BULLETIN EDITOR
nilesh.kutte@gmail.com

**RTN. SANJEEV CHIPLUNKAR**
BULLETIN EDITOR
kalakalpana.advt@gmail.com

Bulletin Issue No: 03

0231-2651444
www.rotarykolhapur.org
Instagram : rotarykolhapur

# Club/District Activities:



**Earlyact Club of Kolhapur Installation: 12 July 2026 :** Our partners in service, Earlyact Club of Kolhapur, held it's Installation on 12th July 2026, at RSSK, where Rotakid Ayan Mate was installed as President and Rotakid Arya Sasurkar was installed as Secretary. The entire Installation ceremony was conducted by rotakids. Rotary President Rtn. Pradeep Pasmal was the Installing officer and 25 other rotarians attended the ceremony.

**Attended Instalaltion of RC Shiroli MIDC : 15 July 2026 :** Rtn. Pradeep Pasmal attended the installation ceremony of Rotary Club of Kolhapur Shiroli MIDC on 15th July

---

## चारधाम यात्रा

उत्तराखंडमधील यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ आणि बद्रीनाथ या चार पवित्र तीर्थक्षेत्रांच्या यात्रेला चारधाम यात्रा म्हणतात. ही यात्रा सामान्यतः एप्रिल-मे ते सप्टेंबर-नोव्हेंबर दरम्यान चालते. जी हिंदू धर्मात मोक्ष मिळवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. हरिद्वार किंवा ऋषिकेशपासून सुरू होणारी ही यात्रा यमुनोत्रीने सुरू होऊन बद्रीनाथला संपते.

### चारधाम यात्रेतील प्रमुख ठिकाणे:

**यमुनोत्री :**
यमुना नदीचे उगमस्थान
आणि देवी यमुनेला समर्पित.





**गंगोत्री :**
गंगा नदीचे उगमस्थान
आणि देवी गंगेला समर्पित.



**केदारनाथ :**
भगवान शंकरांच्या १२
ज्योतिर्लिंगांपैकी एक.



**बद्रीनाथ :**
भगवान विष्णूंना समर्पित.

**यात्रेचा मार्ग:** हरिद्वार→ बरकोट→ यमुनोत्री→ उत्तरकाशी→ गंगोत्री→ गुप्तकाशी → केदारनाथ → जोशीमठ → बद्रीनाथ असा हा प्रवास असतो.

**महत्त्वाचे मुद्दे- नोंदणी :** चारधाम यात्रेसाठी उत्तराखंड सरकारच्या वेबसाईटवर ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे.

**पात्रता व तयारी:** ही यात्रा दुर्गम भागात असल्याने शारीरिकदृष्ट्या सुदृढ असणे आवश्यक आहे. उबदार कपडे, औषधे आणि योग्य तयारीसह जावे.

**उत्तम वेळ:** एप्रिल ते जून आणि सप्टेंबर ते ऑक्टोबर हा काळ यात्रेसाठी उत्तम मानला जातो.

# Rotary International Presidential Theme 2026-27

**CREATE LASTING IMPACT**

The annual presidential message offers us a powerful tool to share compelling Rotary stories in a consistent way. By using a message that aligns with our Action Plan, we can also inspire others to take action with us.

Our 2026-27 message, Create Lasting Impact, encourages all of us, as people of action, to work together to make a meaningful difference in our communities and around the world. It builds on the ways in which members have strengthened their connections to each other and to their communities to Unite for Good, the 2025-26 message. Now, Create Lasting Impact will harness those connections and inspire our members, participants, and the public to take collective actions that lead to a sustainable difference-globally, locally, and personally,

To show the world how members are creating lasting change through Rotary, you can collect information and share stories that demonstrate the impact your club makes through service projects and other work in the community. Another great way to do this is by sharing videos from the series "Personal Perspectives: The Value of Rotary." These short testimonials highlight how Rotary creates positive change around the world and in the lives of our members.

## मेंबर सविस्तर! शुभेच्छा निरंतर ..



**रो. निनाद कुलकर्णी**

जन्म आणि बारावीपर्यंतचे शिक्षण कोल्हापुरात त्यानंतर मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे प्रशिक्षण पुण्यात आणि पुढे मलेशियामध्ये बिझनेस मॅनेजमेंट चे प्रशिक्षण घेऊन २०१२ मध्ये वडिल मिलींद कुलकर्णी यांच्या कोल्हापुरातील NIE Plast (I) Pvt. Ltd. या कंपनीत तो जॉईन झाला. या कंपनीचे वैशिष्ट्य म्हणजे प्रामुख्याने FRP अर्थात फायबर ग्लास पासून बनवलेली उपकरणे ते विकसित करून पुरवतात. धरणातून सोडलेल्या पाण्याचे परफेक्ट रीडिंग घेण्याची यंत्रणा त्यांनी तयार केली आहे . अगदी कालव्यातून सोडले जाणारे पाणी देखील मोजण्याचे दरवाजे त्यांनी विकसित केले आहेत. त्यातही वर्ल्ड बँक फंड द्वारे मोठ्या अधिकाऱ्यांनी फॅक्टरीला व्हिजीट करून त्यांचे कौतुक केले आहे. १९९७ मध्ये FRP Flumes चे पेटंट ही त्यांनी मिळविले आहे व आता एकूण नऊ राज्यातील धरणांसाठी ते नियमित सप्लाय करतात .अलमट्टी या मोठ्या धरणासाठी ही त्यांची मशिनरी वापरली गेली आहे. धरणाच्या दरवाज्यांना बसविण्यासाठी व्हि नॉच ही सिस्टीम ही त्यांनी विकसित केली आहे.

२०१२- १३ मध्ये प्लेग्राउंड आणि वॉटर पार्क मधील एफ आर पी इक्विपमेंटचे प्रॉडक्शन देखील त्यांनी सुरू केले आहे. दापोली येथील वॉटर पार्कला त्यांनी पहिला सप्लाय करून सुरुवात केली आहे.

२०१५ मध्ये एफआरपी बायोगॅस सिस्टीम देखील त्यांनी उत्पादित करायला सुरुवात केली असून छोट्या सोसायटी पासून मोठ्या इंडस्ट्री पर्यंत च्या या सिस्टीम्स ते बनवतात .

येत्या पंधरा वर्षात एक्सपोर्ट सह फॉर्च्यून ५०० कंपनीज मध्ये जाण्याचं त्यांचं स्वप्न आहे .त्याची आई निशिगंधा राजारामपुरी मध्ये निशिका फॅशन हे कपड्यांचे दुकान चालवते. बायको शीतल ने कंपनी सेक्रेटरी चे शिक्षण घेतले असून लेबर ऑडिटचे काम करते. मुलगा आरुष छोटा आहे.

रो. समीर वायकुळ यांनी त्याला रोटरी मध्ये आणले आहे.

६जुलै रोजीच्या त्याच्या वाढदिवसानिमित्त आणि व्यावसायिक प्रगतीच्या रोटरी हेरॉल्ड च्या त्याला हार्दिक शुभेच्छा!

निशिगंधाचा मंद सुखवास<br>
आधी मिलिंद मग शीतल सहवास<br>
आरुष सोबत प्रेमळ आनंद<br>
नि-प्लास्ट म्हणजे प्रगतीचा निनाद

# हास्य कॉर्नर


चलो आपस मे दुनिया बांटले
समंदर आपका, लहरे हमारी,
आसमां आपका, सितारे हमारे,
सुरज आपका, रोशनी हमारी,
**चलो ऐसा करो, सबकुछ आपका,**
**आप हमारे...**

**बी+ve**

ओंजळीत बसेल एवढं
नक्की घ्या
पण सांडण्या अगोदर ते
वाटायलाही शिका !

मित्र परिसासारखे असावेत
म्हणजे आयुष्याचं
सोन होतं...

## Next Meeting :




| Upcoming Projects & Events | Date | Venue |
|---|---|---|
| Paddy Farm with Rotakids | 19 July 2026 | Mathgao |
| 1st Club Assembly | 26 July 2026 | Heritage Residency, Panhala |

# आपण यांना ओळखलेत का?

आपल्या क्लबचे जुने जाणते मेंबर
ओळखलंत तर फोन करा सत्वर.
फोन **9822421262**
बरोबर सभासदांची नांवे आम्ही
पुढील बुलेटीनमध्ये प्रसिध्द करू.
त्याबरोबर इतरांना त्यांची ओळखही करून देऊ.



**रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर व रोटरी समाज सेवा केंद्राचे माजी अध्यक्ष रो.सुभाष मालू**



## आपण यांना बरोबर ओळखलेत...

रो.उपेंद्र देऊसकर
रो.अजिंक्य कदम
रो.राजेंद्र देशिंगे
रो.मोहन गरगटे
रो.दिपक शहा



## THE 4-WAY TEST:

**Of the things we think, say or do,**
Is it the **Truth**? Is it **FAIR** to all concerned?
Will it build **GOODWILL** & **BETTER FRIENDSHIPS**?
Will it be **BENEFICIAL** to all concerned?

We meet every **WEDNESDAY 5:30PM** at
**ROTARY SAMAJ SEVA KENDRA**
Madhavprasad Goenka Bhavan, Collector Office Road,
Nagala Park, Kolhapur 416 003